सांस्कृतिक समितीच्या कार्याचा अहवाल
(शैक्षणिक सत्र 2015-16)

प्रती
प्राचार्य साहेब
मा. सु. पा. महाविद्यालय, मानोरा

विषय :→ शैक्षणिक सत्र 2015-16 मध्ये सांस्कृतिक समीतीने केलेल्या कार्याचा अहवाल सादर करणे बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास विनंती की शैक्षणिक सत्र 2015-16 मध्ये सांस्कृतिक समितीने खालील प्रमाणे कामकाज केले आहे. त्याची तपशिलवार माहिती पुढील प्रमाणे देण्यात आहे.

1) गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार :- माहे जून 2015 मध्ये मानोरा तालुक्यातील एस.एस.सि व एच.एस.सि. परिक्षेमध्ये विशेष गुण घेऊन उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा तालुकास्तरिय सत्कार सोहळा महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये संपन्न झाला. या कार्यक्रमात तालुक्यातील विविध शाळेतील एकूण 84 विद्यार्थी उपस्थित झाले होते. या सत्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मा. अरविंदभाऊ इंगोले हे होते. त्याच प्रमाणे प्रमुख पाहुणे म्हणुन श्री. अशोकराव देशमुख उपविभागीय पोलीस आधिकारी कारंजा लाड, आणि प्राचार्य डॉ. एन. एस. ठाकरे यांनी आपली उपस्थिती दर्शवून गुणवंत विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी प्रोत्साहीत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक प्रा. जे. एन. कांबळे यांनी केले तर संचालन प्रा. एस. व्हि. बोके यांनी केले. शेवटी आभार प्रदर्शनाची जबाबदारी प्रा. एस. व्हि. रिठे यांनी पार पाडली.

2) शाहू महाराज जंयती निमित्य तालुका स्तरिय वक्तृत्व स्पर्धा :- पंचायत समीती शिक्षण विभाग व महाविद्यालयाची सांस्कृतीक समीती यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या

सभागृहामध्ये २८ जून 2015 रोजी "छत्रपती शाहू महाराजांचे कार्य" या विषयावर तालुका स्तरिय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे आपला सहभाग दर्शविला. स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या सर्वच विद्यार्थ्यांनी छत्रपती शाहू महाराजांच्या कार्यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.एस.ठाकरे हे होते. त्याच प्रमाणे प्रमुख अतिथी म्हणून मडावी साहेब बि.ई.ओ.पं.स. मानोरा व श्री.ठाकरे साहेब विषयतज्ञ डायट जि.प. वाशिम हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन संयोजक प्रा.जे.एन.कांबळे यांनी केले. आभारप्रदर्शनाची जबाबदारी प्रा.व्हि.आर.भगत यांनी पार पाडली. या स्पर्धेस एकुण 18 विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. त्यापैकी कु.मोनीका विनोद ठाकरे कु.अश्वीनी रेणुकादास राठोड, हरिष गावंडे या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितिय व तृतिय क्रमांक पटकावला.

3/ <u>क्रांती दिना</u> <u>निमित्य</u> <u>निबंध स्पर्धा</u> :-> ऑगस्ट क्रांती दिना निमित्य सांस्कृतिक समीतीने निबंध स्पर्धेचे आयोजन केले होते. कनिष्ट विभागाची जबाबदारी प्रा.एस.व्हि.बोके यांनी पार पाडली तर वरिष्ट विभागाची जबाबदारी प्रा.जे.एन.कांबळे यांनी पार पाडली. या निबंध स्पर्धेस वरिष्ट महाविद्यालयातील एकुण 06 विद्यार्थ्यांनी क्रांतीकारकांच्या जिवनकार्यावर निबंध लिहले. यापैकी कु.श्रद्धा अशोक शेळके बि.ए.भाग 2 या विद्यार्थीनिनी प्रथम क्रमांक पटकविला तर द्वितीय क्रमांक कु.अश्विनी रमेश सायेड बि.ए.भाग या विद्यार्थीनिनी पटकविला.

4/ <u>सं.गा.बा.अमरावती विद्यापिठाच्या युवा महोत्सवातील सहभाग</u> :-> ऑक्टो-2015 मध्ये जि.एस.विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव या ठिकाणी सं.गा.बा. अमरावती विद्यापिठाने "युवा महोत्सव" आयोजीत केला होता. या युवामहोत्सामध्ये आपल्या महाविद्यालयाने दोन events मध्ये सहभाग घेतला होता. लोकनृत्य - 06 व वक्तृत्व स्पर्धा - 02 एकुण 08 विद्यार्थ्यांनी

5) **स्वयंशासन दिन :-** 5 सप्टे 2015 रोजी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंती निमित्त महाविद्यालयात "स्वयंशासन दिन" साजरा करण्यात आला. या उपक्रमामध्ये सर्व महाविद्यालय विद्यार्थ्यांनी चालविले. विशेषतः विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या विषयाचे अध्यापन कार्य केले. या अध्यापन कार्यामध्ये बि.ए. 12, बि.कॉम - 11 व बि.एस.सि. 16 अशा एकूण 39 विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. त्यापैकी शाखा निहाय निरिक्षण करून उत्कृष्ट अध्यापन कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती.

**कला शाखा** प्रथम :- सचिन हरसुले बि.ए. भाग 3
द्वितीय :- सागर ऐडूतकर बि.ए. भाग 2
तृतीय :- कु. मोनाली जाधव बि.ए. भाग 3

**वाणिज्य शाखा** प्रथम :- उमेश जाधव बि.कॉम. भाग 1
द्वितीय :- कु. नम्रता पाटील —"—
तृतीय :- प्रफुल्ल डेरे —"—

**विज्ञान शाखा** प्रथम :- निलेश ठाकरे बि.एस.सि. भाग 2
द्वितीय :- अक्षय पवार बि.एस.सि. भाग 1
तृतीय :- निलेश शिंदे बि.एस.सि. भाग 3

अशा प्रकारे वरील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन प्रोत्साहीत करण्यात आले होते.

6) **26 नोव्हें 2015 संविधान दिन :-** 26 नोव्हें 2015 रोजी शासनाच्या निर्देशानुसार महाविद्यालयामध्ये सांस्कृतिक विभागाच्या वतीने भारतीय संविधानाची उद्देशपत्रीकेच्या वाचनाचा सामुहीक कार्यक्रम घेतला होता. या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील वरिष्ठ व कनिष्ठ विभागाचे सर्व विद्यार्थी व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संयोजक प्रा. जे.एन. कांबळे यांनी केले. तर संविधानाची उद्देशपत्रीका प्रा. के.एम. मुळे यांनी वाचून दाखविली व उपस्थित विद्यार्थ्यांकडून ती म्हणून घेतली. शेवटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.एस. ठाकरे यांनी संविधानाचे महत्व सांगितले.

7) व्याख्यान माला :- महाविद्यालयामध्ये राष्ट्रमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्य 12 जाने ते 14 जाने या कालावधीत तज्ञ व्यक्तींचे व्याख्यान आयोजीत करण्याचे ठरले होते. परंतु काही अपरिहार्य कारणामुळे 2 व्याख्याने वेळेवर रद्द झाले. त्यामुळे 12 जाने 2016 रोजी डॉ. रमाकांत कोलते माजी मराठी विभाग प्रमुख अमोलोकचंद महाविद्यालय यवतमाळ यांचे "युवकांचे भवितव्य" या विषयावर महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये व्याख्यान झाले. अशा प्रकारे एकच व्याख्यान झाले. पण ते उत्कृष्ट होते. विद्यार्थ्यांचा याला भरपूर प्रतीसाद मिळाला.

8) महापुरुषांच्या जयंत्या व पुण्यतिथ्या :- शैक्षणिक सत्र 2015-16 मध्ये महाविद्यालयामध्ये नियोजनामध्ये नमूद केलेल्या सर्व महापुरुषांच्या जयंत्या व पुण्यतिथ्या त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून साजऱ्या करण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे सुट्टयामध्ये आलेल्या काही जयंत्या व पुण्यतिथ्या मी संयोजक म्हणून स्वतः महाविद्यालयात येऊन साजऱ्या केलेल्या आहेत.

9) "सायबर क्राईम" कार्यशाळा :- फेब्रु 2016 मध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी कारंजा लाड, वाघमारे साहेब ठाणेदार पोलीसस्टेशन, मानोरा व इतर पोलीस अधिकाऱ्यांनी "सायबर क्राईम" या विषयावरील कार्यशाळे मध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यशाळेचे संचालन सांस्कृतिक समीतीने केले होते. कार्यशाळेला जवळपास 250 विद्यार्थी उपस्थित असून, पोलीस अधिकाऱ्यांनी Power point Presentation च्या माध्यमातून Internet च्या युगात कशा प्रकारे गुन्हे घडतात या विषयीची विद्यार्थ्यांना माहीती दिली. या संदर्भात विद्यार्थ्यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे संबधीत पोलीस अधिकाऱ्यांनी दिली.

10) बाहेर ठिकाणी पाठविलेल्या विद्यार्थ्यांची माहीती

| अ.क्र. | स्पर्धेचे नाव | स्पर्धेचे ठिकाण | पाठविलेल्या विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|
| 1) | वक्तृत्व स्पर्धा | अकोला | 02 |
| 2) | स्वच्छता मित्र वक्तृत्व करंडक स्पर्धा पाणिपुरवठा व स्वच्छता विभाग प.स. मानोरा | एल.एस.पी.एम. क.महा. धामणी | 10 |
| 3) | नेहरु युवा केन्द्र वाशिम द्वारा आयोजीत वक्तृत्व स्पर्धा (तालुका स्तर) | अप्पास्वामी महाविद्यालय, शेंदुरजना अढाव | 04 |
| 4) | नेहरु युवा केन्द्र द्वारा आयोजीत वक्तृत्व स्पर्धा (जिल्हास्तर) | आर्य कॉलेज वाशिम | 01 |

वरिल स्पर्धे पैकी स्वच्छता मित्र वक्तृत्व करंडक स्पर्धेमध्ये आपल्या महाविद्यालयातील तिन विद्यार्थ्यांना खालील प्रमाणे रोख बक्षीसे मिळालेली आहेत

① कु. विजेता भिमराव जाधव 5000 रु
② कु. गिता रमेश गव्हाणे 3000 रु.
③ कु. माधवी धनंजय पाटील 2000 रु

एकुण = 10,000 रुपयाची बक्षीसे आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पटकावलेली आहेत.

अशा प्रकारे शैक्षणिक सत्र 2015-16 मध्ये सांस्कृतिक विभागाने आपले कार्य केलेले आहे. तरि हा अहवाल स्विकृत करावा हि विनंती

स्थळ :- मानोरा
दिनांक :- 20/04/2016

आपला विश्वासु
संयोजक
(प्रा. जे.एन. कांबळे)



तालुकास्तरिय गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यातील अध्यक्षस्थानावरुन मार्गदर्शन करतांना मा. अरविंद भाऊ इंगोले (अध्यक्ष ज्ञा. शि. संस्था मानोरा)



गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यासाठी प्रमुख अतिथी श्री. अशोकराव देशमुख उपविभागीय पोलीस अधिकारी संबधी यांचा सत्कार करतांना.



तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांचे एकत्रित छायाचित्र.




तालुका स्तरिय वक्तृत्व स्पर्धेचे प्रास्ताविक करतांना संयोजक प्रा. जे. एन. कांबळे



तालुका स्तरिय वक्तृत्व स्पर्धेचे संचालन करतांना संयोजक प्रा. जे. एन. कांबळे




तालुका स्तरिय वक्तृत्व स्पर्धेत भाग घेतलेल्या विद्यार्थीनी चे छायाचित्र




राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या जयंती निमित्य आयोजीत केलेल्या " तालूका स्तरिय वक्तृत्व स्पर्धेच्या अध्यक्षस्थानी वरून मार्गदर्शन करताना " प्राचार्य डॉ. एन. एस. ठाकरे



तालुका स्तरिय वक्तृत्व स्पर्धेतील उपस्थिती ही दर्शविणारे छायाचित्र



वक्तृत्व स्पर्धेत पारितोषिक पटकाविणाऱ्या विद्यार्थीला पारितोषीक देऊन सन्मान करताना प्राचार्य डॉ. एन. एस. ठाकरे




सं.गा.अ. विद्यापीठाच्या युवामहोत्सवा मध्ये लोकनृत्य सादर करतांनाचे छायाचित्र




लोकनृत्य



लोकनृत्यात सहभागी झालेली चमू व्यवस्थापक व सहभागी कलाकार सह



सं. गा. अ. विद्यापीठाच्या खामगाव येथील युवामहोत्सवातील वक्तृत्व स्पर्धेत भाग घेतांना शंतनु ठाकरे बि. कॉम. भाग 2



गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करतांना मा. अरविंद भाउ ठाकरे अध्यक्ष ज्ञानोपासक शि. संस्था मानोरा.



गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. एन. एस. ठाकरे.



5 सप्टें 2015
शिक्षक दिना निमित्य आयोजीत केलेल्या स्वंयशासन उपक्रमा. दरम्यान विद्यार्थ्यांना शिकवितांना कु. मीना जाधव बि.ए. भाग 3




स्वयंशासनआ उपक्रमात शिकवितांना विद्यार्थी




"शिवजयंती" निमित्त छ. शिवरायांच्या प्रतीमेला पुष्प-हार अर्पण करतांना संयोजक प्रा. जे. एन. कांबळे.



सावित्रीबाई फुले यांच्या प्रतीमेला "अभिवादन" करतांना



महात्मा गांधीच्या जयंती-निमित्त त्यांच्या प्रतीमेस पुल्पहार अर्पण करतांना कु.वि.पु. प्रा. इंगोले सर.




संत गाडगे बाबाच्या प्रतीमेस पुल्पहार अर्पण करतांना प्रा. सोपान इंगोले.

सांस्कृतिक विभागाने आयोजीत केलेल्या उपक्रमाच्या वर्तमानपत्रातील प्रसिद्ध झालेल्या बातम्याची कात्रणे.

# स्वच्छता मित्र वक्तृत्व करंडक स्पर्धा उत्साहात

मानोरा: पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग पंचायत समिती मानोराद्वारा स्वच्छतामित्र वक्तृत्व करंडक स्पर्धा एल.एस.पी.एम. हायस्कूलच्या सभागृहात पार पडली. यावेळी अध्यक्षस्थानी पंचायत समितीचे उपसभापती अभिजीत पाटील, तर प्रमुख अतिथी म्हणून प्रभारी गटविकास अधिकारी गुलाबराव राठोड, प्रभारी गटशिक्षणाधिकारी अनिल पवार, मुख्याध्यापक अरुण खुपसे, विस्तार अधिकारी बी.ए. अवगण, व्यवहारे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना गुलाबराव राठोड म्हणाले की, युवा पिढीने पुढे येवून स्वच्छतेबाबत गावागावात जाणिव जागृती निर्माण करावी, या वक्तृत्व स्पर्धेच्या निमित्ताने महाविद्यालयीन तरुणांना बळ मिळेल व ते तरुण समाजात त्यांचा प्रसार करतील. स्वच्छता विभागाचे समूह समन्वयक आकाश मनवर यांनी या स्पर्धेबाबत माहिती सांगितली. कनिष्ठ महाविद्यालयीन गट व वरिष्ठ महाविद्यालयीन गट या दोन गटात ही स्पर्धा झाली. एकूण २५ स्पर्धकांनी सहभाग घेतला. तरुणाईच्या हाती स्वच्छतेच्या ज्योती, माझ्या स्वप्नातील स्वच्छ निर्मल गाव, ध्यास स्वच्छ महाराष्ट्राचा प्रवास आव्हानाचा, आपलं गाव, आपली योजना, आदी विषय वक्तृत्व स्पर्धेचे होते. या स्पर्धेत वरिष्ट गटात प्रथम क्रमांक धम्मानंद दत्ता उचित, व्दितीय क्रमांक माधवी धनंजय पाटील, तृतीय क्रमांक गीता रमेश गव्हाणे यांनी पटकावला.



मानोरा : जनजागृती अभियानात बोलताना मान्यवर. (सकाळ छायाचित्रसेवा)

# मासुपा विद्यालयात सोशल मीडिया जनजागृती अभियान

मानोरा, ता. १ : मा. सु. पा. महाविद्यालयात पोलिस स्टेशनअंतर्गत सोशल मीडिया जनजागृती अभियान राबविण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एन. एस. ठाकरे हे उपस्थित होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डी.वाय.एस.पी. खांबे, उपविभागीय पोलीस अधिकारी रत्नाकर नवले, मानोरा ठाणेदार कुंदनकुमार वाघमारे उपस्थित होते. यावेळी श्री. नवले बोलताना म्हणाले की, भारतीय संस्कृतीत स्त्रीला देवीचा दर्जा दिलेला आहे. त्यामुळे ती कोणत्याही जाती धर्माची असो तिचा मानसन्मान करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. परंतु, काही कुबुद्धी लोक तरुणांचा गैरवापर करुन त्यांच्याकडून अपराध घडवून त्यांना अडकविण्याचा प्रयत्न करीत आहेत. तरुणांनी नुकतेच बाजारात आलेल्या 'व्हॉट्सअप', फेसबुक याचा चांगल्या गोष्टींसाठीच वापर करावा. तरुणांनी वाईट लोकांशी संगत करुन आपले आयुष्य खराब केल्यापेक्षा अभ्यास करुन आपले भविष्य घडवून आईवडिलांची सेवा करावी. व समाजात मानाचे स्थान मिळवावे असे प्रतिपादन ते म्हणाले.

पुढे बोलताना नवले म्हणाले की, मुली व स्त्रियांचा पाठलाग करणे, त्यांच्याकडे बघून अश्लील चाळे करणे कायद्याने गुन्हा आहे. तसेच त्यांना फेसबुक, व्हाटसअप वर वाईट संदेश पाठविणेही कायद्याने गुन्हा आहे. त्याकरीता त्या व्यक्तीला तुरुंगवास सुद्धा होऊ शकतो. आपल्या वागण्याने इतरांना त्रास होईल तसेच आपल्या आईवडिलांची मान शरमेने खाली झुकेल असे कृत्य करु नये. अशी अनेक उदाहरणे देवून विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती निर्माण केली. तसेच ठाणेदार वाघमारे यांनी सुद्धा आपल्या भाषणात वाईट संगतीमुळे आपले कसे नुकसान होते हे समजावून सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन जे. एन. कांबळे यांनी केले. तर आभार संजय रोठे यांनी मानले. या कार्यक्रमाला बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.